# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०४.११.२००६ रोजी संपन्न झालेल्या विषेश सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक ४ नोव्हेंबर २००६ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तणवानी यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची विषेश सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी ३.३५ वाजता ''**वंदेमातरम्**''या गिताने सुरू झाली. सभेला प्र.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
१२. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१३. स.स.सौ.लक्ष्मी शंकर आशन्ना
१४. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१५. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१६. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२२. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२३. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२४. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२५. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२७. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२८. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद

२९. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३०. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३१. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३२. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३३. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३४. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३५. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३६. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३७. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३८. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३९. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
४०. स.स.श्री.खान निसार मो.खान
४१. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
४२. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४३. स.स.सौ.राऊत छाया विलास
४४. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४५. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४६. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४७. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४८. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४९. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
५०. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
५१. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५२. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५३. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५४. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५५. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५६. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५७. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५८. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५९. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
६०. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
६१. स.स.श्री.खुडे विजय किसन
६२. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६३. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६४. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६५. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक

६६. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६७. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६८. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६९. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७०. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७१. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
७२. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७३. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७४. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७५. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७६. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७७. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७८. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७९. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८०. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
८१. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८२. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल

**चर्चा :**

श्री.संजय जोशी : महानगरपालिकेचे कर्मचारी श्री.बोधनकर यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे त्यांना या सभागृहा तर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.अ.रशिदखान, श्री.संतोष खेंडके : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहावे.

याचवेळी स्व.बोधनकर यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र. ५७८ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार विकास कामांसंदर्भात आढावा घेणे.

**संवाद :**

श्री.मुजीब खान : नवीन प्र.आयुक्त आजच्या बैठकीला उपस्थित आहे. बैठकीला उपस्थित राहिल्याबध्दल धन्यवाद देतो. आजची बैठक ज्या उद्देशाने ठेवली अनेक ठिकाणी विकास कामे झालेली नाही. या सभागृहाने तसेच स्थायी समितीने रोषणगेटच्या दुरूस्तीचे काम मंजूर केले परंतू आजपर्यंत काम करण्यात आले

नाही. प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. वर्तमान पत्रातून असे वाचण्यात आले की आपण आज महापौर पदाचा राजीनामा देणार आहात. आपल्या कार्यकाळात काही ठिकाणची कामे झाली नाही. रोषणगेट ते आझादचौक पर्यत आपल्या कार्यकाळात या रस्त्याचे सर्वे करून पूर्ण रस्त्याचे काम केले जाईल परंतू आजपर्यत काम झाले नाही.शहरातील डी. पी रस्त्यावर तसेच मोकळया जागेवर मोठया प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहे. ती काढण्या बाबत आपण आदेशीत केले दीड वर्ष झाले अद्याप कार्यवाही केली नाही.याचा खूलासा होणे आवश्यक आहे.

श्री.अ.रशिद खान : नोव्हेंबर महिना सूरू झाला. मार्च महिना जवळ आला अनेक विकास कामाच्या संचिका प्रलंबीत आहे. विचारणा केली असता असे कळले की, जे रेग्यूलर आयुक्त आहे, त्यांचेकडून ती कामे मंजूर होतील. प्रत्येक वेळेस दोन महिने प्र.आयुक्त येतील व संचिका मंजूर करणार नाही हे बरोबर नाही. मोठ्या प्रकल्पाच्या संचिका असतील तर त्या वगळून किमान विकास कामाच्या अंदाजपत्रकाच्या संचिका प्र.आयुक्त यांनी मंजूर करण्यास काही हरकत नाही. संबधीत अधिकाऱ्याकडून संचिका त्वरीत मागवून मंजूरी दयावी. नसता स्पील ओव्हरमध्ये कामे जाते.

मा.आयुक्त : ज्या ज्या कामांची आवश्यकता आहे व करणे जरूरी आहे, अशा आवश्यक असलेल्या कामाच्या संचिका मंजूर केल्या जातील. ज्या धोरणात्मक निर्णयाच्या संबधीच्या संचिका आहे त्या रेग्युलर आयुक्त आल्यानंतर आपण सर्वांनी मिळून निर्णय घेणे उचीत राहील.

श्री.मुजीब खान : भूसंपादनाचे व आरक्षणाचे जे ठराव आपण मंजूर केले होते ते आपण दबाव टाकून शासनाकडे पाठविण्याची कार्यवाही होत आहे असे असे वृत्तपत्रात आले या बाबतीत सत्य परीस्थिती काय आहे त्या संबधी संचिका प्रशासनाकडे आलेली आहे काय खूलासा करावा.

मा.आयुक्त : वृत्तपत्रात कसे आले हे मला माहिती नाही परंतू अशी कोणतीही संचिका माझ्याकडे आलेली नाही.

श्री.अ.रशिद खान : वृत्तपत्रात आले की आपण राजीनामा देणार आहात. जर आपण राजीनामा देणार असेल तर नवीन महापौर निवड होईपर्यत आपण प्र.महापौर म्हणून काम पहावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : वृत्तपत्राच्या अधारे हे सभागृहाचे कामकाज चालत नाही. नियमाने चालते. अर्थसंल्पाचा आढावा घेण्यासाठी बैठक आहे त्यावर चर्चा करण्यात यावी.

मा. महापौर : अर्थसंल्पावर चर्चा करावी.

श्री.अ.रशिद खान : वृत्तपत्रात बातमी आली त्यावर आम्ही विश्वास ठेवायचा की नाही.

श्री.संजय सिरसाट : विश्वास ठेवायचा की नाही हा महापौराचा विषय नसून वैयक्तीक आहे. स्थायी समिती सदस्यांच्या मागणीवरून ही सभा आयोजित केलेली आहे अर्थसंकल्पावर चर्चा करावी. त्यानंतर मा. महापौर काय करणार आहे हा सभागृहाचा विषय होत नाही.

श्री.प्रशांत देसरडा :सन २००६-०७ या वर्षाच्या अर्थसंकल्पावर आपण बैठक बोलावली त्याबद्यल अभिनंदन करतो. पक्षाचे महापौर म्हणून जनता आपल्याकडे बघत नाही तर आपण या शहराचा चांगला विकास केला या दृष्टीने जनता आपल्याकडे बघते आहे. आपण झोनवाईज विकास कामाचे अधिकार दिले व त्यानुसार विकास होत आहे. परंतू आजच्या सभेला एकही वार्ड अधिकारी उपस्थित नाही. प्रत्येक वार्ड कार्यालय निहाय आढावा घेवू इच्छितो की कोणकोणत्या वार्ड कार्यालर्यात विकास कामाच्या किती संचिका मंजूर झाल्या व किती प्रलंबीत आहे. व का आहेत याचा खूलासा घेण्यात यावा.

श्री.सिताराम सुरे : आपल्या कार्यकाळात अनेक चांगली कामे झालेली आहे. त्याबध्दल आपले अभिनंदन करतो. माझ्या वार्डातील सन २००५-०६ या वर्षातील काही विकास कामाच्या संचिका अद्यापपर्यंत मंजूरी होवून विकास कामे झालेली नाही. एक डांबरीकरणाच्या कामाची १५ लक्षची संचिका आहे ते काम अद्याप झालेले नाही. ही स्पील ओव्हर मधील कामे आहे. दुसरे एक रस्त्याचे खडकीकरणाचे ५.५० लक्षचे काम आहे ती संचिका गहाळ झालेली आहे. या संदर्भात अधिकारी यांना अनेक वेळा विचारणा केली असता योग्य माहिती मिळत नाही.तसेच एक २.५० लक्षचे सेन्ट्रल जेल ते हर्सूल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळया पर्यत लाईटचे कामासाठी बजेट वळती करून दिले.या संबधी श्री.बनकर उपअभियंता तसेच कार्य.अभियंता श्री.पानझडे यांना अनेक वेळा विचारणा केली परंतू संचिका मिळत नाही. मागिल वर्षातील स्पील ओव्हरचे जी कामे राहिलेली आहे ती करण्यात यावी .ती होणार की नाही या संबधीही खूलासा करण्यात यावा.

सौ.लता दलाल : मा.प्र.आयुक्त हे आज पहिल्यांदाच सभागृहात उपस्थित आहे. त्याबध्दल त्यांनाधन्यवाद देते. एक अपेक्षा निश्चित व्यक्त करावीशी वाटते की वार्डातील विकास कामाच्या ज्या संचिका असतील काही कामाचे अंदाजपत्रक राहिले असतील. त्याकडे मा.आयुक्त यांनी लक्ष देणे आवश्यक आहे. प्रत्येक नगरसेवकांना वेगवेगळया विभागाकडे जावे लागते व मा.आयुक्त नाही असे कारण मिळू नये.

श्री.मुजीब खान : रोषणगेट ते आझाद चौक पर्यतच्या रस्त्याचे काम का झालेले नाही. खूलासा घेण्यात यावा.

श्री.संजय सिरसाट : आजची बैठक ही अर्थसंक्ल्पावर आढावा घेण्यासाठी असून प्र.मुख्यलेखाधिकारी आजच्या सभेला उपस्थित नाही.

अति.शहर अभियंता : रोषनगेट ते आझाद चौक पर्यंतच्या रस्त्याचे काम हे रस्ते विकास महामंडळाकडे आहे. राम मंदीर समोरील जो भाग आहे तेथील जवळपास १२९ मिळकती महानगरपालिकेला ताब्यात घेणे आहे.

श्री.मुजीब खान : ज्या ठिकाणी रस्त्यासाठी जागा रिकामी आहे. राममंदीर ते आझादचौक व रोषणगेट ते शरीफ कॉलनीपर्यत रस्ता क्लिअर आहे.जो रस्ता रिकामा झालेला आहे तेथे विकास केला जात नाही. १३०-१३२ घरे राहीलेले आहे. या

रस्त्यावर गुडघ्याइतके मोठे खड्डे पडलेले आहे. घाण पडलेली आहे. जे अतिक्रमण काढायचे आहे ज्या लोकांना मोबदला दयायचा आहे उपआयुक्त महसूल यांनी सर्वे करून कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते. परंतू आजपर्यंत त्याकडे लक्ष दिले नाही.

मा.महापौर : जेव्हढा रस्ता चांगला व रिकामा आहे तेथे काम करण्यास हरकत नसावी.

अति.शहर अभियंता : सन २००६-०७ मध्ये या रस्त्यासाठी १० लक्षची तरतूद केलेली होती. ते अंदाजपत्रकही तयार केलेले होते परंतू एमएसआरडीसीने तो रस्ता महानगरपालिकेकडे हँडवर्क केलेला नाही. त्यामूळे क्युरीजमध्ये १० लक्षचे काम मंजूर झाले नाही. पूढील आठवड्यात सेक्शन मध्ये बसून ते क्लिअर झाल्यानंतर मंजूर होईल, त्यानंतरच काम करता येईल.

मा. महापौर : या रस्त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद असेल तर ताबडतोब अंदाजपत्रक तयार करावे.

श्री.मुजीब खान : रोषण गेट व लगतचे त्याचे सर्कलमध्ये कामाचे अंदाजपत्रक का तयार करण्यात आले नाही.सर्कलचा कोणताही नकाशा डिझाईन तयार केला नाही.४.४५ लक्षचे काय काम करणार.

श्री.संजय सिरसाट : आजची बैठक ही अर्थसंकल्पावर बोलावली असली तरी अधिकारी हे सभागृहात उशीरा आले.त्यांना माहित होते की या सभागृहात कोणते नाटय घडणार आहे. या घडामोडीला मा. आयुक्त उपस्थित राहणे गरजेचे होते. प्र.आयुक्त यांचेकडे कामाचा व्याप मोठा असलातरी आजच्या सभेला उपस्थित राहणे गरजेचे आहे असे येथील उपआयुक्त व सचिव यांनी सांगितले असेल. जेंव्हा केंव्हाही आयुक्त रजेवर जातात त्यांचा जार्च इतराकडे दिला जातो . चार्ज देणे म्हणजे संपूर्ण अधिकार प्रदान करणे असा माझा समज आहे. काही दिवसापूर्वीच मा.आयुक्त यापूर्वीच्या सर्वसाधारण सभेसाठी व स्थायी समितीच्या बैठकीला उपस्थित नव्हते. मा.आयुक्त यांनी त्यांचा प्रतिनिधी म्हणून ज्या अधिकाऱ्याना सभेत बसविले व बसविल्यानंतर जे काही निर्णय होतील ते मला कळवावे असे म्हटले. निर्णय घेवू नये.परंतू सभागृहात जेंव्हा जे आयुक्तांच्या जागेवर बसतात त्यांना असे वाटते की मी आयुक्तच आहे. माझ्या माहिती प्रमाणे मा. आयुक्ताच्या जागी काम पाहिले म्हणून दोन चार संचिकेवर त्यांनी सूध्दा सहया केल्या. त्याचें चुकले असे मी म्हणत नाही. अर्थसंकल्पाची बैठक असली तरी ही चार दिवसापूर्वीच लावलेली आहे. डिसेंबर महिना येत आहे रिवाईज बजेट येणार आहे. झोन वाईज वसूली किती असे विचारले तर असे सांगण्यात येते की मूख्यलेखाधिकारी या सभागृहात नाही. उत्तरच कोणी देवू शकणार नाही कारण अर्थसंकल्प कसा झाला हे त्यांना माहित नाही.जे काही निर्णय झाले ते ऐतिहासीक निर्णय झालेले आहे आजची सभा ही शांततेत पार पाडणार आहोत. काहीही गोधंळ या सभेत होणार नाही. बजेट वर चर्चा करायची असेल तर मा.आयुक्त मुख्यलेखाधिकारी येथे हजर राहणे आवश्यक होते. जे काही मोठे कामे

असतील अंदाजपत्रक असतील ते थांबून ठेवावे असे मा.आयुक्तांनी तोंडी आदेश दिले अशी माझी माहिती आहे. प्रत्येक आयुक्त आल्यानंतर स्पील ओव्हरचे कोणतेही काम शिल्लक ठेवणार नाही असे सांगतात. गेल्या सहा वर्षात १५ आयुक्त येवून गेले परंतू स्पील ओव्हरचे कामे अदयाप संपली नाही. उलट स्पील ओव्हर वाढतच गेले. डिसेंबर पर्यत स्पील ओव्हर हे जवळपास ७० कोटीपर्यंत जाणार आहे. आज अर्थसंकल्पावर चर्चा करून काही साध्य होणार नाही. विषय होता तो महत्वाचाच होता. वृत्तपत्रातील बातम्या येतात त्यावर विश्वास ठेवायचा की नाही असा प्रश्न एक स. सदस्यांनी विचारला परंतू काही बातम्या माहिती असून सुध्दा बोलायच्या नसतात. बातमी काय होती ते सांगू नये आपल्याला काय मांडायचे ते आपण मांडू शकता.उदा. उपमहापौर हे महापौर यांना राजीनामा देणार त्यानंतर मा.महापौर हे मा.आयुक्तांना राजीनामा देणार आहे. आताच मा.आयुक्तांनी म्हटले की जे काही धोरणात्मक बाबी आहे त्यावर सहया करणार नाही. इतर ज्या रूटींगच्या संचिका आहे त्यास मंजूरी दिली जाईल हीच अपेक्षा आहे. व यापूढे जे काही कामकाज करणे अपेक्षीत आहे ते करावे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद महापालिकेच्या सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार नमूद केलेले विकास कामे तातडीने करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>चर्चा :</u>**

मा.उपमहापौर : महापौर पदावर श्री.तनवानी किशनचंद तसेच मला उपमहापौर म्हणून दीड वर्षाचा कालावधी गेला असून मला माझ्या वैयक्तीक कारणामूळे उपमहापौर पदाचा राजीनामा मी मा. महापौर यांचेकडे देत आहे. (उपमहापौर यांनी दीड वर्षाच्या कार्यकाळात केलेल्या विकासा संबंधी यथोचित भाषण केले.)

याच वेळी मा.महापौर हे उपमहापौर यांचेकडून त्यांचा उपमहापौर पदाचा राजीनामा स्विकारतात.

मा.महापौर : मी माझ्या खाजगी कारणामूळे महानगरपालिकेस लेखी स्वरूपात राजीनामा देत असून मा.आयुक्त यांचेकडे देत आहे.

याच वेळी मा.महापौर त्यांचा राजीनामा मा.आयुक्तांकडे देतात.

यानंतर स.सदस्य श्री.देसरडा प्रशांत,श्री.कचरू मोरे,श्री.संजय सिरसाट,सौ.लता दलाल, श्री.अ.रशिद खान, श्री.काशिनाथ कोकाटे, श्रीमती कला बोरामणीकर यांनी मा.महापौर,मा.उपमहापौर यांनी दीड वर्षाच्या कार्यकाळात केलेल्या विकास कामा संबंधी यथोचित भाषण केले. यानंतर मा.किशनचंद तनवाणी यांनीही यथोचित भाषण केले.

या नंतर राष्ट्रगीताने सभा संपन्न झाली.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.